MHSN060006292025

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २४.०२.२०२५ |
| नोंदणी दिनांक | : | २४.०२.२०२५ |
| निकाल दिनांक | : | ०८.०६.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०१ ०३ १५ |

**मिरज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३),**

**जि. सांगली यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती. पी.डी.गायकवाड)**

**नियमित फौजदारी खटला क्र.५५/२०२५**

**नि.क्र.५५/ब**

(गु.र.नं. २७६/२०२४, एम.आय.डी.सी.कुपवाड पोलीस स्टेशन.)

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासनाकरिता<br>पो. ठा. अधिकारी<br>एम.आय.डी.सी.कुपवाड पोलीस स्टेशन,<br>ता. मिरज, जि. सांगली. |
| प्रतिनिधित्व | | सरकारी अभियोक्ता श्रीमती.व्ही.के.मदने. |
| आरोपी | | १) श्रीकांत अंकुश गोसावी,<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय – प्लॉटींग,<br>२) रफिक अब्दुल शेख,<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय – प्लॉटींग,<br>३) भोराप्पा शिवाजी आमते,<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय – पान शॉप,<br>४) आकाश अंकुश गोसावी,<br>वय – ३१ वर्षे, व्यवसाय – व्यापार,<br>५) किरण राजाराम पाटील,<br>वय – २७ वर्षे, व्यवसाय – व्यापार, |

| | | |
|---|---|---|
| | | ६) इमाम उर्फ चिच्या मेहबुब शेख,<br>वय – २४ वर्षे, व्यवसाय – पान शॉप,<br>७) धनाजी मारुती बुदनूर,<br>वय – ३७ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>८) अमीन मेहबुब शेख,<br>वय – ३१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>९) आब्बास मेहबुब शेख,<br>वय – २९ वर्षे, व्यवसाय – चालक,<br>आरोपी क्र.१, ३ व ४ रा.आर.ए.मसाले, नवजीवननगर, अहिल्यानगर, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली.<br>आरोपी क्र.२,६,८ व ९ रा. न्यू विजयनगर, संतोषीमाता मंदीरासमोर, अहिल्यानगर, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली.<br>आरोपी क्र.५ रा. डॉ.गोसावी यांच्यासमोर, बाझारपेठ, अहिल्यानगर, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली.<br>आरोपी क्र.७ रा. प्रकाशनगर, गल्ली क्र.५, अहिल्यानगर, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली. |
| प्रतिनिधित्व | | आरोपींचे विधीज्ञ व्ही.डी.गोसावी. |

| | |
|---|---|
| गु. घ. तारीख | १९.११.२०२४ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २०.११.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०१.०३.२०२५ |
| दोषारोप तारीख | २१.०८.२०२५ |
| पुरावा नोंदवण्यास झालेली सुरुवात | ०२.०६.२०२६ |
| ज्या दिवशी युक्तीवाद ऐकून प्रकरण न्यायनिर्णयाकरीता ठेवण्यात आले. | ०८.०६.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख | ०८.०६.२०२६ |
| शिक्षा घोषित केली असल्यास त्याची तारीख | निरंक |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | कोणत्या अधिनियमांखाली | दोषी किंवा दोष मुक्त केले | दिलेली शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ प्रमाणे सुट दिलेबाबत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीकांत अंकुश गोसावी. | २०.११.२०२४ | २०.११.२०२४ | भा.न्या.संहिता ११८(१), ११५(२), ३५१(२), १८९(२), १९१(२), १९३(३), १७४ सह कलम १९०, लोकप्रतिनिधी प्रतिनिधित्व अधिनियम १२३(२)(५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)/१३५. | निर्दोष | निरंक | लागू नाही |
| २. | रफिक अब्दुल शेख. | –”– | –”– | –”– | –”– | –”– | –”– |
| ३. | भोराप्पा शिवाजी आमते. | –”– | –”– | –”– | –”– | –”– | –”– |
| ४. | आकाश अंकुश गोसावी. | –”– | –”– | –”– | –”– | –”– | –”– |
| ५. | किरण राजाराम पाटील. | –”– | –”– | –”– | –”– | –”– | –”– |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | इमाम उर्फ चिच्या मेहबुब शेख. | –"– | –"– | –"– | –"– | –"– | –"– |
| ७. | धनाजी मारुती बुदनूर. | –"– | –"– | –"– | –"– | –"– | –"– |
| ८. | अमिन मेहबुब शेख. | –"– | –"– | –"– | –"– | –"– | –"– |
| ९. | आब्बास मेहबुब शेख. | –"– | –"– | –"– | –"– | –"– | –"– |

## सरकार/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. सरकारतर्फे –**

| **अनु. क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| १. | विजय वसंत घाडगे. | फिर्यादी. |
| २. | पवन विलास घाडगे. | साक्षीदार. |
| ३. | अभिषेक राजेश गोसावी. | साक्षीदार. |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार असल्यास –**

| **अनु. क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| | | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| **अनु.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|

| क्रमांक | | (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | | निरंक |

## सरकार/आरोपी/न्यायालयीन निशाण्यांची यादी

**अ. सरकारतर्फे –**

| अनु. क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४३ | फिर्यादीवरील सही. |
| २. | ४४ | छापील फिर्यादीवरील सही. |
| ३. | ४७ | घटनास्थळ पंचनामा. |
| ४. | ४८ ते ५० | जप्ती पंचनामे. |
| ५. | ५१ ते ५४ | वैद्यकीय प्रमाणपत्रे. |

**ब. आरोपीतर्फे –**

| अनु. क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अनु. क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | निरंक |

**ड. महत्वाच्या भौतिक वस्तू –**

| अनु. क्रमांक | आर्टीकल निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | | निरंक. |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक ०८ जुन, २०२६)

**१.** आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १७४ सह कलम १९०, लोकप्रतिनिधी प्रतिनिधित्व अधिनियम १२३(२)(५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)/ १३५ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

### अभियोग पक्षाची संक्षिप्त वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे –

**२.** दिनांक १९.११.२०२४ रोजी दुपारी ३.३० वा.च्या. सुमारास फिर्यादी विजय वसंत घाडगे यांचे मित्र व काँग्रेस आय पक्षाचे काम करणारे शंकर पवार यांचा फिर्यादीला फोन आला व त्यांनी त्यांना अमिन शेख याने माबाईलवरुन फोन करुन पृथ्वीराज पाटील यांचा प्रचार केलास तर तुला जिवंत ठेवणार नाही, तुला भविष्यात अवघड होईल अशी धमकी दिलेबाबत सांगितले. त्यानंतर त्यांना ४.१५ वा.चे. सुमारास शफीक शेख यांचा फोन आला व त्याने सांगितले की श्रीकांत जाधव, रफिक शेख व त्यांची लोक हे त्यांच्या लोकांच्या गाड्या आडवत आहेत, दमदाटी करत आहेत, त्यांच्या गाड्या चेक करत आहेत, थोड्या वेळापुर्वी मेहबुब नदाफ याची गाडी चेक केली आहे असे सांगून त्यांना असे का करायला लागले आहेत असे विचारण्यास सांगीतले. त्यानंतर फिर्यादीने शफीक शेख यास कोठे आहेस असे विचारुन त्याचेजवळ जिल्हा परिषद शाळेजवळ गेले. तेथुन त्यांनी श्रीकांत जाधव यास फोन करुन त्याचे घरी नवजीवन नगर अहिल्यानगर येथे ४.४५ वा. गेले. तेव्हा त्याच्या घराचेसमोर खुर्चीवर श्रीकांत जाधव, रफिक

शेख, भोराप्पा आमटे बसले होते. तेव्हा फिर्यादीने त्यांना आमच्या लोकांच्या गाड्या का आडवताय, त्यांना दमदाटी का देताय तुम्ही आम्ही आज पर्यंत एकत्र राहीलोय असे समजुन सांगत होते. त्यावेळी श्रीकांत जाधव याने आम्ही जयश्री पाटील यांचा प्रचार करीत आहे, त्या निवडुन आल्या नाहीत तर, तुम्हाला व तुमच्या कार्यकर्त्यांना जिवंत ठेवणार नाही असे म्हणून श्रीकांत जाधव व रफिक शेख यांनी फिर्यादीसोबत असलेला शफीक शेख यास हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादी सोडवत असताना त्याचे घरातुन काठ्या आणुन दिल्यावर त्या तिघांनी फिर्यादी व शफीक शेख यास काठ्याने मारण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्याठिकाणी त्या तिघांचे त्या ठिकाणी असलेले साथीदार चिच्या, आकाश गोसावी, किरण पाटील, आमीन शेख, धनाजी बुधनुर, आब्बास हे त्या ठिकाणी आले. आकाश गोसावी व किरण पाटील यांच्या हातात चाकु होता, चिच्या याचेकडे लोखंडी रॉड होता, आमीन, धनाजी यांचेकडे काठ्या होत्या. ते त्यांना मारहाण करत असताना फिर्यादीचा पुतण्या पवन घाडगे व भाचा अभिषेक गोसावी हे त्या ठिकाणी आले व त्यांनी भांडणे सोडवुन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी त्यांनाही वरील सर्वांनी डोक्यात अंगावर ठिकठिकाणी काठी, रॉडने व आब्बासने हाताने मारहाण केली. त्यावेळी आकाश गोसावी व किरण पाटील हे फिर्यादीचा भाचा अभिषेक गोसावी यास चाकुने मारत असताना त्याने त्याचा वार चुकविला तेव्हा त्याच्या हाताच्या बोटाला त्या चाकुने किरकोळ जखम झाली. तेव्हा फिर्यादी अभिषेकला वाचविण्यासाठी त्याचेकडे गेले तेव्हा किरण पाटील याचा चाकु फिर्यादीच्या उजव्या हाताची करंगळी व त्या शेजारील दोन बोटे व तळहाताला लागुन जखम झाली. त्यावेळी आकाश गोसावी हा चाकुने फिर्यादीला मारणार तेवढयात भाचा अभिषेक याने त्याचा चाकु पकडला. त्यानंतर फिर्यादीबरोबर असलेले शफीक शेख, पवन घाडगे, अभिषेक गोसावी यांना बाजुला घेऊन फिर्यादी एम.आय.डी.सी.कुपवाड पोलीस ठाण्यात गेले.

त्यानंतर त्यांनी सिव्हील हॉस्पीटल येथे प्राथमिक उपचार घेऊन पुढील उपचार डॉ.अविनाश पाटील यांच्या सुश्रुत हॉस्पीटलमध्ये घेतला. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द कुपवाड एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे घटनेबाबत रिपोर्ट दिला.

३. वरील रिपोर्टवरुन एम.आय.डी.सी.कुपवाड पोलीस स्टेशन येथे आरोपींविरुद्ध गुन्हा क्रमांक २७६/२०२४ नोंदविण्यात आला.

४. तपासिक अंमलदार श्री.व्ही.एस.गाडवे, पोलीस उपनिरीक्षक यांनी गुन्ह्याचा तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले, घटनास्थळ तसेच गुन्हयातील हत्यार जप्तीचा पंचनामा केला, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन आरोपींविरुद्ध उपरोक्त कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपींविरुद्ध नि.क्र.२८ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आला. आरोपींनी आरोप नाकबूल करुन त्यांचेविरुद्ध खटला चालविण्याची विनंती केली.

६. अभियोगपक्षाने एकूण तीन साक्षीदार तपासले. आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून न आल्याने आरोपींचे फौ.प्र.सं.कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले नाही.

७. प्रस्तुत खटल्याचा निर्णय होण्यासाठी खालील मुद्दे उपस्थीत होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खाली नमूद करण्यात येत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, दि.१९.११.२०२४ रोजी १६.४६ वा. चे सुमारास या न्यायालयाचे स्थळसिमेत आरोपी श्रीकांत अंकुश गोसावी याच्या घरासमोर, अहिल्यानगर, | .. नाही. |

नवजीवननगर, कुपवाड, ता.मिरज,जि.सांगली येथे आरोपींनी फिर्यादी विजय वसंत घाडगे व साक्षीदार यांना मारहाण करण्याच्या उद्देशाने बेकायदेशिर जमाव केला व भारतीय न्याय संहिता कलम १८९(२) सह कलम १९० प्रमाणे गुन्हा केला ?

२. अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी बेकायदेशिर जमावाचे सामायिक उद्दीष्ट साधण्यासाठी बलप्रयोग करुन दंगा केला व भारतीय न्याय संहिता कलम १९१(२) सह कलम १९० प्रमाणे गुन्हा केला ? .. नाही.

३. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपींनी बेकायदेशिर जमावाचे सदस्य असताना स्वतःजवळ घातक शस्त्रे काठया, चाकू व लोखंडी रॉड बाळगले व भारतीय न्याय संहिता कलम १९१(३) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला ? .. नाही.

४. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.९ यांनी बेकायदेशिर जमावाचे सदस्य असताना फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक किरकोळ दुखापत केली व भारतीय न्याय संहिता कलम ११५(२) सह १९० अन्वये गुन्हा केला ? .. नाही.

५. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ८ यांनी बेकायदेशिर जमावाचे सदस्य .. नाही.

| | | |
|---|---|---|
| | असताना फिर्यादी व साक्षीदार यांना साक्षीदार यांना काठया, चाकू व लोखंडी रॉडने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला ? | |
| ६. | अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ याने बेकायदेशिर जमावाचे सामायिक उद्दीष्ट साधण्यासाठी फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली व भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला ? | .. नाही. |
| ७. | अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ याने बेकायदेशिर जमावाचे सदस्य असताना विधानसभा निवडणूकीतील मतदार विजय वसंत घाडगे यांच्या मतदानाच्या मुक्त हक्काच्या वापरात स्वच्छेने हस्तक्षेप करुन त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली आणि उमेदवार श्रीमती. जयश्री पाटील यांच्या विरोधात मतदान करण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला व भारतीय न्याय संहिता कलम १७४ सह कलम १९० अन्वये गुन्हा केला? | .. नाही. |
| ८. | अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ याने बेकायदेशिर जमावाचे सदस्य असताना फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी दिली आणि | .. नाही. |

उमेदवार श्रीमती. जयश्री पाटील यांच्या विरोधात मतदान करण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला व लोक प्रतिनिधीत्व अधिनियम कलम १२३(२)(५) अन्वये गुन्हा केला ?

९. अभियोगपक्ष शाबीत करतो का, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचा त्यांच्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात सार्वजनिक शांतता किंवा सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी, अव्यवस्थेला प्रतिबंध करण्यासाठी, विविक्षित कृतींना मनाई करण्याचा बंदी आदेश असतानाही सदर बंदी आदेशाचा भंग केला आणि अवज्ञा केली आणि त्याद्वारे त्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१)(३) दंडनीय कलम १३५ नुसार गुन्हा केलेचे सिध्द केले आहे काय ? .. नाही.

१०. काय आदेश ? अंतिम आदेशाप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ९ करीता –</u>**

८. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चेसाठी घेतले आहेत. अ.सा.क्र.१ विजय वसंत घाडगे– फिर्यादी (नि.४२) यांनी त्यांच्या सरतपासात दिनांक १९.११.२०२४ रोजी विधानसभा इलेक्शनचा काळ होता व ते कॉग्रेस पक्षाच्या प्रचार फेरीमध्ये सहभागी झाले होते असे कथन केले आहे. तसेद दिवशी कोणतीही

मारहाणीची घटना घडली नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी फिर्याद व छापील फिर्यादीवरील अंगठयाचा ठसा मान्य केला परंतू त्यातील मजकूर बरोबर नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे कथनास महत्वाचे मुद्दयांवर दुजोरा न दिल्यामूळे विद्वान सरकारी वकीलांनी नमूद साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारले. सदर तपासणी दरम्यान देखील ते आरोपींना गुन्ह्यात गोवणारा पुरावा अभिलेखावर आणण्यामध्ये असमर्थ ठरले. याउलट सदर साक्षीदाराने आरोपी व त्याच्यात समजोता झाला असून त्याना पुढे केस चालवायची नाही व कोणतेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे मान्य केले. प्रस्तूतचे प्रकरण खबर देणार यांनी आरोपींसोबत न्यायालयाबाहेर मिटविले असून त्यांनी त्याबाबत तडजोड पुरसीस नि.क्र.४१ दाखल केली आहे. त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३४६ प्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

९. अ.सा.क्र.२ पवन विलास घाडगे व अ.सा.क्र.३ अभिषेक राजेश गोसावी यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १९.११.२०२४ रोजी विधानसभा इलेक्शनचा काळ होता व ते कॉग्रेस पक्षाच्या प्रचार फेरीमध्ये सहभागी होते. तसेच सदर दिवशी कोणतीही मारहाणीची घटना घडली नाही. पोलीसांनी तपासकामी त्यांचा जबाब घेतला नव्हता. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षाचे कथनास महत्वाचे मुद्दयांवर दुजोरा न दिल्यामूळे विद्वान सरकारी वकीलांनी नमूद साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारले. सदर तपासणी दरम्यान देखील ते आरोपींना गुन्ह्यात गोवणारा पुरावा अभिलेखावर आणण्यामध्ये असमर्थ ठरले. याउलट सदर साक्षीदारांनी आरोपी व त्यांच्यात समजोता झाला असून त्यांना पुढे केस चालवायची नाही व कोणतेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे मान्य केले.

**१०. भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ कलम १०१ प्रमाणे :-**

जो कोणी स्वतः प्रपादन केलेल्या तथ्यांच्या अस्तित्वावर अवलंबून असलेल्या कोणत्याही वैध हक्काबाबत किंवा दायीत्वाबाबत न्यायनिर्णय देण्यास कोणत्याही न्यायालयाला आवाहन करील, त्याने ती तथ्ये अस्तित्वात असल्याचे शाबीत केले पाहिजे. जेव्हा एखादी व्यक्ती कोणत्याही तथ्यांची अस्तित्व शाबित करण्यास बांधलेली असते तेव्हा शाबीतीची जबाबदारी त्या व्यक्तीवर आहे असे म्हंटले जाते.

**११.** आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरिता प्रस्तुत कलमांचे मुख्य घटक सिध्द करणे आवश्यक आहे. अभियोग पक्ष सदर बाब सिध्द करण्यास संपुर्णतः अपयशी ठरला आहे. आरोपींना दोषी ठरविण्याकामी कोणताही सबळ पुरावा न्यायपटलावर अभियोगपक्षाने सादर केला नाही. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये आपसमजुतीने तडजोड झाल्यामुळे आरोपींविरुध्द कोणतीही कारवाई करणे उचित ठरत नाही. करीता मुद्दे क्र.१ ते ९ ची उत्तरे नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.१० बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.१ श्रीकांत अंकुश गोसावी, क्र. २. रफिक अब्दुल शेख, क्र. ३. भोराप्पा शिवाजी आमते, क्र. ४. आकाश अंकुश गोसावी, क्र. ५. किरण राजाराम पाटील, क्र. ६.

इमाम उर्फ चिच्या मेहबुब शेख, क्र. ७. धनाजी मारुती बुदनूर, क्र. ८. अमीन मेहबुब शेख व क्र. ९.आब्बास मेहबुब शेख, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १७४ सह कलम १९०, लोकप्रतिनिधी प्रतिनिधित्व अधिनियम १२३(२)(५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)/ १३५ या दंडनीय अपराधांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन कदबे आणि जात मुचलके रद्द करण्यात येत आहेत.

३. सदर न्यायनिर्णयाच्या विरुद्ध मा. वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल झाल्यास त्या अपिलाची नोटीस आल्यावर आरोपींनी मा. वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्यासाठी प्रत्येकी रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) चे बंधपत्र फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये द्यावेत.

४. अपिल कालावधी नंतर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल काठया व लोखंडी रॉड हे मुल्यहिन असल्यामुळे त्यांचा नियमानुसार नाश करण्यात यावा.

५. अपिल कालावधी नंतर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल एक लोखंडी सुरा व चाकू हा जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांच्याकडे नियमानुसार

नाश करण्याकरिता पाठविण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णयाचा मजकुर प्रत्यक्ष कार्यालयीन संगणकावर टंकलिखीत करुन जाहीर केला)

POONAM DIPAK GAIKWAD
Digitally signed by POONAM DIPAK GAIKWAD
Date: 2026.06.08 18:01:20 +0530

**मिरज.**
**दिनांक –०८.०६.२०२६**

**(श्रीमती.पी.डी.गायकवाड )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३**
**मिरज.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. U.P.Patil | | |
| Name of Court | :- | $2^{nd}$ Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 08 | 06 | 2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 08 | 06 | 2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 08 | 06 | 2026 |